Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - B

## Women's Rights : Status & Goal



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor:
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

Editor:
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci.
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 22 | महिला सबलीकरणातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे योगदान<br>प्रा.डॉ.प्रदीप जगताप | 81 |
| 23 | बीड जिल्ह्यातील महिला सरपंचाच्या कुटुंबातील दर्जाचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>डॉ.सुधीर आ.येवले / डॉ.रुपाली कुलकर्णी | 90 |
| 24 | स्त्री व शेतीचा परस्पर संबंध डॉ. हेमचंद दुधगवळी | 95 |
| 25 | पंचायत राज व्यवस्थेतील स्त्री प्रतिनिधींची भूमिका डॉ. पाटील व्यंकट इरवंतराव | 100 |
| 26 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार<br>प्रा.डॉ.लोमेश्वर रामचंद्रराव घागरे | 104 |
| 27 | महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या<br>कु.आढाव ज्योती सुभाष | 107 |
| 28 | मानव अधिकार आणि महिला डॉ.ज्योती व्हि. कवठे (रणदिवे) | 113 |
| 29 | भारतीय स्त्री आणि पंचायत राज व्यवस्था डॉ. राजेश्री एन. कडू | 119 |
| 30 | भारतीय संविधान आणि भारतीय महिलांचा मतदानाचा हक्क<br>डॉ. प्रा. किशोर कल्लापा म्हेत्री | 122 |
| 31 | स्त्रीयांचे मानवाधिकार आणि भारतातील घटनात्मक तरतुदी<br>प्रा. डॉ. हरीदास लाकडे | 127 |
| 32 | भारतीय परिप्रेक्षात – स्त्रियांचे मानवी हक्क काही संवैधानिक तरतुदी<br>प्रा. लोमेश ज्ञा. बावनकुळे | 130 |
| 33 | महिला आर्थिक विकास महामंडळ व महिला सक्षमीकरण<br>संतोष देविदास मोहदरे | 136 |
| 34 | महिलांचे मानवी हक्क शिंदे मनिषा संदिपान | 141 |
| 35 | मानवधिकार आणि महिला प्रा.डॉ.गजानन बाबुराव मरगीळ | 146 |
| 36 | भारतीय महिला प्रतिनिधीत्व आणि राजकारण डॉ.तक्षशिला मोटघरे | 151 |
| 37 | मानवी हक्क आणि स्त्री-पुरुष असमानता डॉ. प्रांजू हिरेखण | 155 |
| 38 | महिला सशक्तीकरन : संवैधानिक प्रावधान एवं वास्तविकता प्रा.सौ. प्रतिभा टावरी | 161 |
| 39 | महिला सक्षमीकरण आणि पंचायत राज्य व्यवस्था डॉ.स्मिता दि. जोशी | 166 |
| 40 | स्त्रीमुक्ती लढयातील आद्य क्रांतीकारी, सावित्रीबाई फुले<br>प्रा.अरविंद म.पुनवटकर | 169 |




Scanned with CamScanner

# महिला सबलीकरणातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे योगदान

प्रा.डॉ.प्रदीप जगताप
दादा पाटील महाविद्यालय,कर्जत.जि. अहमदनगर

**प्रस्तावना**

आधुनिक लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्व आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा भारतातील राष्ट्रीय पक्ष आहे. भारतीय राजकीय प्रक्रियेमध्ये महिलांचे प्रमाण कमी आहे. महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्याबरोबरच महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्त्री – पुरूष समानता, महिलांना अधिकार देणे, आरोग्याच्या सुविधा पुरविणे या बाबतीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आग्रही राहिला आहे. महिला सबलीकरणामध्ये महिलांचा राजकीय सहभाग, आर्थिक स्वावलंबन, स्त्री – पुरूष समानता, महिलांचे अधिकार यांचा पुरस्कार केला जातो. निर्णय घेणे, प्रबोधन करणे, राजकीय समाजीकरण करणे यातून राजकीय पक्ष महिला सबलीकरणामध्ये महत्वाचे योगदान देत असतात. प्रस्तूत शोधनिबंधात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे महिला सबलीकरणातील योगदान यावर प्रकाश टाकला आहे.

**उद्दिष्टये**

१) महिला सबलीकरणाची संकल्पना समजून घेणे.
२) महिला सबलीकरणातील राजकीय पक्षाची भूमिका समजून घेणे.
३) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा महिला सबलीकरणातील योगदानाचा आढावा घेणे.

**गृहितके**

१) महिला सबलीकरणात राजकीय पक्षांनी महत्वाची भूमिका पार पाडली आहे.
२) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महिला सबलीकरणात महत्वाची भूमिका पार पाडली आहे.
३) महिलांचा राजकीय सहभाग वाढविणे,महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे,महिलांना अधिकार देणे, स्त्री–पुरूष समानता याबाबतीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने कार्य केले आहे.

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंधासाठी प्राथमिक साधनांचा तसेच दुय्यम साधनांचा अवलंब केला आहे. पक्ष कार्यालयातील माहिती, विविध संदर्भ ग्रंथ, पक्षाचे अहवाल, माहिती पुस्तिका, मासिके, दैनिक वर्तमान पत्रातील बातम्या, वेब साईटवरील माहिती, प्रकाशित लेख इत्यादी साधने वापरली आहेत.

**महिला सबलीकरण**

राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क प्राप्त करून देणे महिला सबलीकरणात अभिप्रेत आहे. महिला सबलीकरण ही महिलांच्या हक्कांचा पुरस्कार करणारी आणि महिलांच्या विकासाशी संबंधित प्रक्रिया आहे. महिलांना पुरूषांच्या बरोबरीने विकास आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे महिला सबलीकरणात महत्वाचे आहे. महिलांना समान स्थान, संधी, सत्ता, प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी यामध्ये प्रयत्न केले जातात. स्त्री – पुरूष समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण करणे, स्त्रियांना आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळवून देणे, स्त्रियांवरील अन्याय – अत्याचार दूर करणे, स्त्रियांना रोजगाराभिमुख बनविणे, राजकीय सहभाग वाढविणे, सर्वच क्षेत्रात विकासाची संधी देणे ही महिला सबलीकरणाची उद्दिष्टये आहेत. ही उद्दिष्टये साध्य करण्यासाठी आर्थिक स्वावलंबन, राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग, दबावतंत्र, कायदे करणे, आरक्षण या साधनांचा वापर केला जातो.



Scanned with CamScanner

राजकीय पक्ष

लोकशाही प्रक्रियेमध्ये राजकीय पक्षाचे अनन्यसाधारण महत्व आहे. लोकांचा राजकीय सहभाग राजकीय पक्षांच्या माध्यमातून होत असतो. राजकीय सहभाग, निर्णयप्रक्रियेतील सहभाग, दबावतंत्र, कायदेनिर्मिती, राजकीय समाजीकरण, प्रबोधन, आंदोलन या माध्यमांतून राजकीय पक्ष लोकशाहीत विविध भूमिका पार पाडत असतात. आपला सामाजिक पाया विस्तारतांना राजकीय पक्ष महिलांचा सहभाग वाढविण्याच्या प्रयत्नांतून महिला सबलीकरणासंबंधी योगदान देत असतात. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षही त्यास अपवाद नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना १० जून १९९९ रोजी ज्येष्ठ नेते मा. शरद पवार यांनी केली आहे. महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचे ते कृतीशील पाईक आहेत. त्याचबरोबर त्यांच्यावर त्यांच्या मातोश्री शारदाबाई पवार यांच्या विचारांचा प्रभाव आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महिलांच्या सबलीकरणाविषयी सकारात्मक भूमिका घेतली आहे.

'राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने स्त्रियांच्या विषयी सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. स्त्रीया या कर्तृत्ववान असतात मात्र त्यांना पारंपारिक सामाजिक व्यवस्थेमध्ये संधी दिली जात नाही. त्यामुळे समाजात सामाजिक व आर्थिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. देशाचा पर्यायाने समाजाचा सामाजिक व आर्थिक विकास करण्यासाठी स्त्रीयांना चुल आणि मुल या मानसिकतेमधून बाहेर आणले पाहिजे. महिलांना विकासाची संधी मिळण्यासाठी महिलांना प्रत्येक क्षेत्रात आरक्षण मिळावे यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा कायम सकारात्मक भूमिका घेत आहे. आरक्षणाच्या माध्यमातून विकासाच्या मुळ प्रवाहात महिलांना सहभागी करून घेण हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.' (टिकेकर अरूण,२००८:२४६)

महिलांचा राजकीय पक्षातील सहभाग हा पक्षासाठी महत्वाचा असतो, कारण समाजातील जवळपास ५० टक्के महिला असतात. महिलांच्या सहभागातून पक्षाचा सामाजिक पाया विस्तारण्यास मदत होते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी पुढील प्रयत्न केलेले आहेत.

१) संघटनात्मक यंत्रणा

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आपली संघटनात्मक यंत्रणा तयार केली आहे. त्या यंत्रणेमध्ये महिला आघाडी ही एक महत्वाची संघटना आहे. या महिला संघटनेच्या माध्यमातून महिलांचा पक्षात सहभाग होताना दिसतो. या राष्ट्रवादी महिला आघाडीची यंत्रणा चार पातळयावर काम करते. प्रदेश पातळी, जिल्हा पातळी, तालुका पातळी, गाव पातळी यावर पक्षाची ही महिला संघटना काम करते. या महिला आघाडीच्या माध्यमातून स्त्रीयांवरील अन्याय,अत्याचार दूर व्हावेत, स्त्रीयांच्या संदर्भातील अनिष्ट रूढी,प्रथा,परंपरा दूर व्हाव्यात, महिलांचे सबलीकरण व्हावे, महिलांना विधिमंडळात व संसदेत ३३ टक्के आरक्षण मिळावे, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात सन्मानाने वागविले जावे यासाठी प्रयत्न केले जातात.

२)युवती संघटना

राष्ट्रवादी युवती संघटनेची स्थापना १० जून २०१२ रोजी पक्षाच्या वर्धापना दिवशी करण्यात आली. राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसच्या अध्यक्षा मा. सुप्रियाताई सुळे या आहेत. युवतीमध्ये सक्षम आणि कर्तबगार नेतृत्व विकसित करण्यासाठी युवती कॉंग्रेस प्रयत्नशील आहे. युवती कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर राज्यभर ५० युवती मेळावे घेतले. हया मेळाव्यातून पक्षाचा जवळपास २ लाख युवतींशी संपर्क आला.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने राज्यातील तरूणींना राजकारणात सहभागी करून घेण्यासाठी राष्ट्रवादी युवती कॉंग्रेस ही पक्षांतर्गत संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. युवतींसाठी



Scanned with CamScanner

असा वेगळा विभाग स्थापन करणारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा देशातील पहिला पक्ष ठरला आहे.या पूर्वी महिलांना, युवतींना सामाजिक व राजकीय क्षेत्रात इतक्या मोठया प्रमाणात पुढे आणण्याचा विचार कोणी केला नव्हता. राजकारणात कोणतीही पार्श्वभूमी नसली तरी कर्तृत्व, नेतृत्व व इच्छाशक्ती असेल तर जरूर युवतींना संधी मिळेल असा प्रयत्न युवती राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून केला जात आहे.

'राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसच्या माध्यमातून स्त्री–भ्रूण हत्या या संदर्भात मोठया प्रमाणात काम करण्यात आले आहे. युवती कॉंगेसच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मुलींचे प्रश्न सोडविले गेले. एस.टी. ची समस्या होती. एस.टी. मध्ये मुलींसाठी, युवतींसाठी, महिलांसाठी राखीव जागा करा, यासाठी युवती कॉंग्रेसच्या सदस्या एस.टी महामंडळाच्या अध्यक्षांना भेटल्या आहेत.त्याचबरोबर एस. टी स्थानकांमध्ये महिला शौचालयांचा प्रश्न खुप गंभीर होता. ग्रामीण स्तरावर शौचालयेच नाहीत आणि जिथे आहेत, तिथे अवस्था फारच वाईट आहे. त्या त्या ठिकाणी युवती कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी डेपो मॅनेजरला भेटून ते प्रश्न सोडविले.

मार्च महिन्यात राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसतर्फे संपूर्ण महाराष्ट्रभर जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो. त्यातून महिलांच्या विविध प्रश्नांवर चर्चा घडवून आणली गेली आहे. महिला सबलीकरणासाठी त्यातून प्रयत्न झाले आहेत. व्यसनमुक्तीसाठी सुद्धा राष्ट्रवादी युवती कॉंग्रेस आग्रही आहे. 'गुटख्याची होळी' हा कार्यक्रम युवतींनी यशस्वीरित्या राबविला आहे. तसेच पथनाटयाद्वारे गुटख्याच्या दुष्परिणामांची माहिती दिली आहे. (राष्ट्रवादी, ऑगस्ट २०१४:२५–२७)

**राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसचा १२ कलमी कार्यक्रम पुढील प्रमाणे**

१) उच्च शिक्षणाच्या सोयीसुविधा, सहाय्य आणि स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन
२) स्त्री – भ्रूणहत्या विरोधी जणजागरण मोहीम
३) हुंडाबंदीचा अंमल व साधे – सामुदायिक विवाहांचे आयोजन
४) छेडछाड मुक्ती व सुरक्षितता अभियान
५) कौटुंबिक हिंसाचार मुक्त समाज
६) व्यसनमुक्ती मोहीम व गुटखाबंदी अंमलबजावणी
७) स्वत:चे व मोफत शौचालये
८) सुरक्षित, वेळेवर व सुखकर एस.टी तथा सिटीबस प्रवास
९) खेळ व क्रिडांगणाच्या संधी व सुविधा
१०) बहुपयोगी समुपदेशन अभियान
११) राष्ट्रवादी युवती अभिसरण
१२) राष्ट्रवादी युवती मंच उभारणी

(www.supriyasule.com)

**३) मा.शरद पवारांचे पुरोगामी विचार व महिलांसाठी घेतलेले निर्णय**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष 'मा.शरद पवार हे पुरोगामी विचारांचे आहेत. त्यांच्या मते, महिलांना संधी मिळाली की त्या योग्य निर्णय घेतात,संयतपणे,जबाबदारीनं परिस्थिती हाताळतात आणि कर्तृत्व गाजवतात. सर्वसाधारण महिला पारदर्शकपणाने आणि व्यापक हिताचा विचार करून निर्णय घेतात. त्याचबरोबर महिला आपल्या निर्णयाबाबत निश्चियी असतात.' महिलांना त्यांचे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी लागणारी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांचीही आहे असे मा. शरद पवार यांचे मत आहे. (पवार शरद,२०१५:१६७ व १६९)

मा.शरद पवार यांनी सत्तास्थानी असताना महिला सबलीकरणासाठी पुढील महत्वाचे निर्णय घेतले.



Scanned with CamScanner

अ) राज्य महिला आयोगाची निर्मिती – १९९३

ब) राज्य सरकारमध्ये महिला व बालविकास खात्याची स्वतंत्र निर्मिती –१९९३

क) लष्करी सेवामध्ये महिलांना संधी – जून १९९१

ड) कौटुंबिक मालमत्तेवर पुरूषांप्रमाणेच महिलांनाही हक्क देणारा कायदा– १९९३

इ) स्त्रियांना एम.पी.एस.सी मध्ये ३३ टक्के आरक्षण

ई) महिला धोरण – १९९४

उ) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण :–३३ टक्के व सध्या ५०टक्के

या सर्व निर्णयामुळे मा. शरद पवार यांच्याविषयी महिला वर्गामध्ये आदराचे स्थान आहे. त्याचा फायदा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला झालेला आहे.

**४) मा.सुप्रियाताई सुळे यांचे नेतृत्व व त्यांचे कार्य**

मा.सुप्रियाताई सुळे यांच्याकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे महिला नेतृत्व म्हणून पाहिले जाते. सक्रिय राजकारणात महिलांना योग्य संधी मिळावी या दृष्टीने मा.सुप्रियाताई सुळे यांनी महिला बचत गट आणि युवतींचे मेळावे घेवून महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार केले आहे. या कामाला शहरी व ग्रामीण विभागात मोठा प्रतिसाद मिळाला आहे.या अभियानातून महिला नेतृत्वाची पायाभरणी करण्याचे काम राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने केले आहे.

**'जागर हा जाणिवांचा ; तुमच्या माझ्या लेकीचा'**

स्त्रीभ्रुणहत्ये विरोधात मा.सुप्रियाताई सुळे यांनी 'जागर हा जाणिवांचा; तुमच्या माझ्या लेकीचा' हे अभियान राबविले. या अभियानाला महाराष्ट्रात भरभरून प्रतिसाद मिळाला. प्रभातफेऱ्या, चर्चासत्रे, प्रदर्शने संपूर्ण राज्यभरात आयोजित केली गेली. स्त्री–भ्रुण हत्या व एकूणच महिलांच्या अस्तित्वाच्या प्रश्नांना जनमानसापर्यंत घेऊन जाणे, या कार्यात युवतीचा सहभाग मिळविणे व विविध समाजघटकांना या कार्यासाठी एकत्र आणले आहे.

जागर चा संदेश पदयात्रेच्या माध्यमातून लोकांच्या गावांपर्यंत आणि शहरांपर्यंत पोहचवण्यासाठी मा.सुप्रियाताई सुळे यांच्या नेतृत्वाखाली दि. २५ ऑगस्ट २०११ या दिवशी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, जि.सातारा ते महात्मा फुले वाडा, पुणे अशा ६० कि.मी ची पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेची सांगता २८ ऑगस्ट २०११ रोजी पुण्यातील गणेश कला क्रिडा मंच येथे झाली. राज्याच्या विविध जिल्हयातील, विविध जाती–धर्माच्या, गरीब–श्रीमंत ५०० हुन अधिक मुली या पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या.

**यशस्विनी अभियान**

२००५ मध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष श्री. शरद पवार यांनी महिला बचत गटांना कमीत कमी व्याजदरानं कर्ज देण्याचा आणि त्यायोगे स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा मुद्दा सर्वप्रथम हाती घेतला. त्यानंतर सुप्रियाताई सुळे यांनी यशस्विनी अभियानाच्या माध्यमातून या प्रश्नाला हात घातला. त्यांनी पाठपुरावा करून बचत गटांना ४ टक्के व्याजदराने कर्ज देण्याची मागणी मान्य करून घेतली. त्याचा फायदा २,२५,००० बचतगट आणि पर्यायाने २५,००,००० महिलांना झाला.

यशस्विनी अभियानाच्या संस्थापक मा.सुप्रियाताई सुळे यांच्या सातत्यपूर्व प्रयत्नामुळे महाराष्ट्रातील बचतगटांना चांगलीच चालना मिळाली. यशस्विनी अभियानाची सुरूवात ३ जानेवारी २००८ रोजी झाली. अभियानाच्या कार्यक्षेत्रात सबंध राज्यातील बचतगट येतात. ६ राज्यस्तरीय समन्वयक, ६ विभागीय समन्वयक, ५४ जिल्हास्तरीय समन्वयक, ३५९ तालुकास्तरीय समन्वयक असे सगळे मिळून ४२५ समन्वयक अभियानाचे काम पाहतात. लहान लहान गावातील स्त्रीया बचत गटांच्या माध्यमातून मुख्य प्रवाहाला जोडल्या गेल्या आहेत. बचत गटांच्या सहभागानंतर

स्त्रियांच्या स्वच्छता, शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्तर यात बरीच प्रगती झाल्याचे दिसते.

महिला विषयक कार्य

अ) महिलांना झेंडावंदनाचा अधिकार

स्थानिक स्वराज्य संस्थामधील पदाधिकारी महिलांना झेंडावंदनाचा अधिकार नाकारला जात होता. त्यासंदर्भात तत्कालीन ग्रामविकासमंत्री मा.श्री.आर.आर. पाटील यांना एका महिला सरपंचाचे पत्र आले होते. त्यामध्ये आम्हाला सरपंच केले जातंय, पण १ मे, २६ जानेवारी, १५ ऑगस्टला झेंडावंदन मात्र आमच्या हस्ते होत नाही. कोणत्यातरी पॅनलचा प्रमुख येतोय, कुठं नवरा येतोय, तोच झेंडावंदन करतोय असे नमुद केले होते. याचा विचार करून महिलांना अधिकार देण्याच्या संदर्भात महाराष्ट्र सरकरने निर्णय घेवून ज्या गावामध्ये सरपंच महिला आहेत, त्या गावामधला पुरूष जर झेंडयाच्या दोरीला हात लावेल, तर सरळ तुरूंगात घालू, फौजदारी गुन्हे नोंद करू अशा पद्धतीचे परिपत्रक काढले. त्यातून महिलांना झेंडावंदनाचा अधिकार दिला गेला. पुरोगामी महाराष्ट्राला शोभेल असा हा निर्णय होता. त्या निर्णयामुळे महिलांचे राजकिय प्रक्रियेमधील स्थान उंचावल्याचे दिसून येते. महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी व महिलांचे सबलीकरण होण्यासाठी हे महत्वाचे पाऊल होते. हा पुरोगामी निर्णय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते श्री. आर. आर. पाटील यांनी घेतला.(राष्ट्रवादी, मार्च,२०१५:३२—३३)

ब) राजमाता जिजाऊ : माता — बाल आरोग्य पोषण मोहीम

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पांतर्गत ०—६ वयोगटातील बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी राजमाता जिजाऊ : माता — बाल आरोग्य पोषण मोहीम मार्च २००५ मध्ये सुरु करण्यात आली. या मोहीमेमध्ये गर्भवती स्त्रियांची प्रसुतीपूर्व काळजी घेणे, नवजात अर्भकांची काळजी घेणे, ० ते ३ वर्षे वयोगटातील बालकांचे आरोग्य, आहार, लसीकरण या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत ०—६ वर्ष वयोगटातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करणे व त्यांच्या पूर्वप्राथमिक शिक्षणावर भर देणे ही या मोहीमेची उद्दिष्टये आहेत. (Duggal Ravi and other, (2005), Health and Health care in Maharashtra, A Status Report, CEHAT, Mumbai)

क) महिला समुपदेशन केंद्र

महिला समुपदेशन केंद्र हि योजना ५ डिसेंबर २००५ पासून कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आघाडी सरकारने महाराष्ट्रात सुरू केली.महिला सक्षमीकरणासाठी उचललेले हे एक महत्वाचे पाऊल आहे. महिला समुपदेशन केंद्रे पोलिस स्टेशन मध्ये महिलांकरीता स्थापन केली आहेत. हि समुपदेशन केंद्रे स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येतात. या केंद्रामार्फत महिलांना त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होवू नये म्हणून कायदेशीर मार्गदर्शन व सल्ला देण्यात येतो.

हि योजना महाराष्ट्रामध्ये तत्कालीन गृहमंत्री मा. आर.आर. पाटील यांनी राबविली आहे. मा.आर.आर. पाटील यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये महिला थोरला भाऊ म्हणून पाहत असत. त्यांच्याच प्रयत्नातून महिलांना न्याय देण्यासाठी ही योजना राबविली गेली. यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला पदाधिकारी तसेच महिला नेत्या मा.सुप्रियाताई सुळे यांनी पाठपुरावा केला होता.

ड) तेजस्विनी ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम

भारतीय समाजव्यवस्थेतील उपेक्षित वर्ग म्हणून आजही महिलांचा विचार करावा लागतो. लिंगभेदावर आधारित विषमतेला, शोषणाला त्यांना तोंड दयावेच लागते. परिणामी महिलांच्या प्रश्नांविषयी अधिक संवेदनशीलतेने विचार होण्याची गरज आहे. महिलांना पुरूषांच्या बरोबरीने



Scanned with CamScanner

विकास आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्त्रीयांना आर्थिक अधिकार मिळवून देवून त्यांना रोजगाराभिमुख बनविणे आवश्यक आहे. स्त्रीला रोजगाराभिमुख बनविण्यातून दोन गोष्टी साध्य होणार आहेत. एक म्हणजे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि दुसरे म्हणजे स्त्री आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनेल. स्त्रीयांवरील अन्याय अत्याचार कमी करण्यासाठी त्यांना अर्थिकदृष्टया स्वावलंबी बनविणे अत्यावश्यक आहे. आतापर्यत स्त्रीचे कार्यक्षेत्र हे केवळ चूल आणि मूल यापुरतेच मर्यादीत ठेवण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सरकारने महिलांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविण्यासाठी तेजस्वीनी ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरू केला आहे.

तेजस्विनी ग्रामीण महिला कार्यक्रम हा वर्ष २००७ ते २०१५ या आठ वर्षाच्या कालावधीसाठी महाराष्ट्रात राबविण्यात आला. तो महाराष्ट्रातील ग्रामीण ३३ जिल्हयात राबविण्यात आला. स्वयंसहाय्य बचत गटांची निर्मिती व त्यांचे बळकटीकरण करून लोक संचलित साधन केंद्राच्या रूपाने लोकांच्या संस्था विकसित करणे, महिलांना सुलभ पतपुरवठा उपलब्ध करून देणे, उद्योजकीय विकासासाठी विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून देणे व बाजारपेठ सुविधा निर्माण करणे, महिलांच्या राजकीय, वैचारिक, सामाजिक, आर्थिक अशा सर्वांगिण विकासासाठी सर्वोत्तपरी प्रयत्न करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून डिसेंबर २०१० अखेर ५३,५३६ महिला स्वयंसहाय्यक बचत गटांचे बळकटीकरण करण्यात आले. २५७ लोकसंचलित साधन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. ५५,७१८ महिलांनी स्वयंरोजगारास प्रारंभ केला आहे. बॅकांच्या माध्यमातून ३१२.९२ कोटी कर्ज बचतगटांना देण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांतर्गत ३०२८ गावांमध्ये स्त्रीभ्रुण. हत्या, हुंडा, महिलांचे व मुलांचे कुपोषण, बालविवाह इत्यादी ज्वलंत सामाजिक प्रश्नावर प्रभावी जाणिव जागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. ऐवढेच नाही तर महिला स्वयंसहाय्य बचतगटांच्या माध्यमातून महिलांचे राजकीय नेतृत्व ही पुढे येत आहे. स्वयंसहाय्य बचतगटाच्या ३०० हून अधिक महिला ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थावर निवडून आलेल्या आहेत.

महिला बचतगटांची चळवळ महाराष्ट्रात उभी करण्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला नेत्या खा. सुप्रियाताई सुळे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्या स्वत: महिला बचतगटांच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होताना दिसतात. ऐवढेच नाही तर महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंना चांगली बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी त्या सतत प्रयत्नशील असतात. महिलांनी बचतगटांच्या माध्यमातून एकत्र येवून स्वयंरोजगार करावा यासाठी त्या महिलांना प्रोत्साहन देत असतात. महिला बचतगटांना बॅकांनी स्वस्त व्याजदराने कर्जपुरवठा करावा यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रियाताई सुळे आग्रही आहेत.

**इ) महिला धोरण**

कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सरकारने ७ मार्च २००१ रोजी राज्यशासनाचे बहुउद्देशिय असे महिला धोरण घोषित केले. १९९४ साली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा. शरद पवार मुख्यमंत्री असताना पहिल्यांदा महाराष्ट्र सरकारने महिला धोरण जाहीर केले होते. त्यानंतरच्या गेल्या ७ वर्षाच्या बदलत्या काळात निर्माण झालेली आव्हाने लक्षात घेवून हे नवे महिला धोरण जाहीर करण्यात आले. विशेष म्हणजे यामध्ये सर्व शासकीय, निमशासकीय, सहकारी व शिक्षण संस्थांनी महिलांना सक्षम करण्यासाठी कृती कार्यक्रमाची सनद तयार करावी असे बंधन घालण्यात आले आहे. दरवर्षी ३ जानेवारी रोजी पाळण्यात येणाऱ्या सावित्रीबाई फुले स्त्री मुक्ती दिनी या सनदेचे जाहीर वाचन करावे असा निर्णय घेण्यात आला. या धोरणामध्ये राज्य



Scanned with CamScanner

महिला कोषाची स्थापना, ५ वर्षात ५ लाख महिलांचे आर्थिक दृष्टया सबलीकरण, महिलाविकासासाठी नगरपालिकांनी करावयाच्या खर्चात दुप्पट वाढ, स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिलांच्या आरक्षणात वाढ आणि महिला संरक्षण विधेयक इत्यादी बाबींचा समावेश आहे.

महाराष्ट्र सरकारने २००१ मध्ये निश्चित केलेल्या महिला धोरणाची वैशिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

१) आर्थिक वर्ष २००२—०३ पासून स्त्री केंद्रीभूत धरून नियोजन आमलात आणणे.
२) राष्ट्रीय उत्पन्न काढताना महिलांच्या घरकामाचे मुल्य लक्षात घ्यावे अशी शिफारस केंद्र सरकारला करणे.
३) महिलांसाठी अर्थसंकल्पात विशिष्ठ रक्कम राखून ठेवण्यासाठी महिला विशेष घटक योजना तयार करण्यात येणार आहे.
४) महिला व मुले यांच्या विकासासाठी महानगरपालिका व नगरपालिका यांनी करावयाच्या खर्चाचे प्रमाण ५ टक्क्यावरून १० टक्क्यापर्यंत करण्याचे बंधन घालण्यात आले.
५) राज्य महिला कोषाची स्थापना करण्यात येणार असून या कोषाद्वारे राज्यातील महिलांना लघू पतपुरवठा करण्यात येणार आहे.
६) बालविवाह प्रथेस आळा घालण्यासाठी कडक प्रतिबंधात्मक उपाय योजने.
७) महिलांच्या सबलीकरणासाठी विशेष निधीची तरतूद करणे.
८) महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.
९) महिलांना आरोग्य सुविधा, प्रसाधन गृह, पाळणाघर सुविधा आदी योजना आणि कार्यक्रम राबविने.
१०) महिलांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे आरक्षण वाढविणे.
११) महिलांसाठी असे वातावरण निर्माण करायचे कि त्यामुळे त्यांना आर्थिक आणि सामाजिक धोरण निर्मितीत सहभागी करून घेण्याबाबत जाणिव निर्माण होईल.
१२) महिलांना उपलब्ध मानवी अधिकारांचा कमाल उपयोग करून घेण्यासाठी कार्यक्षम बनविणे.
१३) महिलांचा शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा या क्षेत्रातील सहभाग निश्चित करणे.
१४) महिलांच्या प्रती कोणत्याही प्रकारचा भेदभाव दूर करण्यासाठी योग्य अशी कायदाप्रणाली आणि सामुदायिक प्रक्रिया विकसित करणे.
१५) समाजातील महिलांच्या प्रति होणाऱ्या दुर्व्यवहारात परिवर्तन करण्यासाठी सर्व सामाजिक घटकांमधील महिलांना पुरूषांइतकेच महत्व देणे.

हे महिला धोरण ठरविण्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा सक्रिय सहभाग आहे. राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस हे धोरण ठरविण्यासाठी आग्रही राहिलेली दिसते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला नेत्या खा. सुप्रियाताई सुळे, चित्रा वाघ, वंदना चव्हाण यामध्ये आघाडीवर होत्या. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष मा. शरद पवार यांनी महिलांच्या बाबतीत सतत पुरोगामी भूमिका घेतलेली आहे. राज्यातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि शारिरीक जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी हे धोरण निश्चितच आदर्श आहे.



Scanned with CamScanner

ई) राज्यातील महिला स्वयंसहाय्य बचतगटांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज पुरवठा

राज्यातील महिलांचे आर्थिक स्वावलंबन व्हावे, बचतगटांना प्रोत्साहन मिळून रोजगारांच्या नवीन संधी निर्माण व्हाव्या आणि राज्यातील महिला स्वयंसहाय्य बचतगटांची चळवळ अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यातील महिला स्वयंसहाय्य बचत गटांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज पुरवठा करणे ही योजना ८ ऑक्टोबर २००८ पासून सुरू केली. स्वयंसहाय्य बचत गटातील सभासद हे अत्यंत गरीब व गरजू असल्याने त्यांना सवलतीच्या दराने अधिकाधिक कर्ज पुरवठा प्राप्त व्हावा याकरिता ही योजना शासनाने घोषित केली. त्यानुसार राज्य शासनामार्फत व्याजदरामध्ये ७ टक्के पर्यंत परतावा करण्यात येतो. ही योजना सरकारी अनुदान नाही, तर जे बचत गट मुद्दल व कर्जाची परतफेड नियमितपणे करतील त्यांना प्रत्येक ६ महिन्यानंतर या योजनेचा लाभ देण्यात येतो.

हि योजना आणण्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या खा. सुप्रियाताई सुळे यांचे मोठे योगदान आहे. महिला बचत गटांच्यासाठी त्यांनी राबविलेले यशस्वीनी अभियान महत्वाचे आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याचा हा प्रयत्न आहे. तत्कालीन अर्थमंत्री, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते श्री. जयंत पाटील यांनी या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली होती.

उ) जिजामाता महिला आधार योजना

एखाद्या कुटूंबातील कर्ता पुरूष अपघातात मृत्यू पावला तर त्याच्या विधवा पत्नीस व मुलांना मदतीचा हात देण्यासाठी ही योजना कॉंग्रेस – राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आघाडी सरकारने सुरू केली. राज्यात १९९९ पासून ही योजना राबविली जात आहे. विशेषत: ज्या कुटूंबाचे उत्पन्न अतिशय तुटपुंजे आहे अशा कुटूंबासाठी ही योजना एक प्रकारे वरदान ठरली आहे. अशा कुटूंबातील कर्त्या पुरूषाचे अपघाती निधन झाल्यास त्या कुटूंबावर, त्यातही मृत व्यक्तीच्या पत्नी व मुलांवर दु:खाचा जणू डोंगरच कोसळतो. त्यामुळे त्यांना मदतीचा हात देण्याची नितांत गरज असते. ती गरज या योजनेच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न कॉंग्रेस – राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सरकारने केला आहे.

निष्कर्ष

महिला सबलीकरणामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. महिलांचा राजकीय सहभाग वाढविणे, महिलांना आर्थिक स्वावलंबी बनविणे, महिलांना अधिकार देणे, महिलांना विकासाची संधी देण्यासाठी आरक्षण देणे, स्त्री – पुरूष समानता निर्माण करणे, महिलांवरील अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी प्रयत्न करणे अशी महिला सबलीकरणासाठी महत्वपूर्ण कामे केली आहेत. राजकीय निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढविणे याकडे महिला सबलीकरणाचे एक साधन म्हणून बघितले जाते. राजकीय निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढल्याने महिलांच्या विकासासाठी, संरक्षणासाठी कायदे करता येतात. राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने राजकारणातील वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार कमी होण्यासाठीही मदत होणार आहे. त्या अनुषंगाने राजकीय पक्षांच्या माध्यमातून महिला सबलीकरणासाठी आणखी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

संदर्भ

१. बिरमल नितीन,२०११,'राष्ट्रवादी कॉंग्रेस, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल', समकालीन प्रकाशन, पुणे
२. देवळाणकर शैलेंद्र, २०१०,समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद
३. पवार शरद,२०१५, लोक माझे सांगाती, राजहंस प्रकाशन, पुणे,



Scanned with CamScanner

४. टिकेकर अरूण,२००८, स्पर्धा काळाशी, रोहन प्रकाशन, पुणे
५. चव्हाण विद्या, २०१०, शरद पवार : महासागर एक दृष्टीक्षेप, मुंबई
६. सुळे सुप्रिया, २०१२, प्रेरणा, यशस्वीनी सामाजिक अभियान
७. करडेकर अनिल, २०१२, महाराष्ट्राचे अर्थसंकल्प (१९६० ते २०११), विद्या प्रकाशन,नागपूर
८. कांडगे राम,२०१०,लोकनेते शरदराव पवार, चाकण, पुणे,राजश्री प्रकाशन
९. पवार प्रकाश, २०१६, सामाजिक न्यायाची संघर्षभूमी:कॉंग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपाचा उदय, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स
१०. कुंटे माधवी, २००९, स्त्री सुक्त, डायमंड प्रकाशन, पुणे
११. आढाव विलास,२०१०, महिला सबलीकरण, पुणे विद्यापीठ, पुणे
१२. महिला संबंधी धोरण, जून १९९४,महाराष्ट्र शासन
१३. महिला धोरण,२००१, महाराष्ट्र शासन
१४. योजना, सप्टेंबर २०१६
१५. लोकराज्य, मार्च २०१०
१६. राष्ट्रवादी, ऑगस्ट २०१४
१७. राष्ट्रवादी, मार्च,२०१५
१८. Duggal Ravi and other, (2005), Health and Health care in Maharashtra, A Status Report, CEHAT, Mumbai
१९. www.supriyasule.com
२०. www.maharashtra.gov.in



Scanned with CamScanner